# जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी कार्यालय, सोलापूर

जा.क्र.२०२०/मशा./कार्या-४/नै.आ./आरआर-२७४ दिनांक २२/०३/२०२०

# जाहिरात

राज्यात कोरोना (कोविड-१९) विषाणूचा वाढता प्रादुर्भाव लक्षात घेऊन उद्रेकसदृश्य परिस्थिती हाताळण्यासाठी अधिकचे आरोग्य सेवा देणाऱ्या अधिकारी व कर्मचाऱ्यांची आवश्यकता भासू शकते. त्याची पूर्वतयारी म्हणून जिल्हास्तरावरून शासकीय/निमशासकीय/महापालिका/आर्म फोर्सेस (मेडिकल कॉर्प) मधून सेवानिवृत्त झालेले परंतु, आरोग्य सेवा देण्यास सक्षम असणाऱ्या डॉक्टर्स, परिचारिका व आरोग्य कर्मचाऱ्यांना स्थानिक स्तरावरून आवाहन करून ऑनलाइन अर्जाद्वारे इच्छुक सेवानिवृत्त अधिकारी व कर्मचाऱ्यांची यादी तयार करणेबाबत शासनाचे निर्देश आहेत.

त्यानुसार शासकीय/निमशासकीय/महापालिका/आर्म फोर्सेस (मेडिकल कॉर्प) मधून सेवानिवृत्त झालेले परंतु, आरोग्य सेवा देण्यास सक्षम असणाऱ्या डॉक्टर्स, परिचारिका व आरोग्य कर्मचारी या पदासाठी शैक्षणिक पात्रताधारक इच्छुक उमेदवारांकडून अर्ज मागविण्यात येत आहेत.

| अ.क्र. | पदनाम | पदसंख्या | शैक्षणिक पात्रता |
|---|---|---|---|
| १ | वैद्यकीय अधिकारी | ५० | M.B.B.S/P.G. any Subject/B.A.M.S. |
| २ | परिचारिका (स्टाफ नर्स) | १०० | एस. एस. सी. उत्तीर्ण, G.N.M. कोर्स |
| ३ | आरोग्य कर्मचारी (M.P.W.) | ५० | M.P.W. कोर्स उत्तीर्ण |

**सूचना :-**

१) उपरोक्त पदाकरिता दिनांक २३/०३/२०२० रोजी सकाळी १०.०० ते सायं. ६.०० वा. पर्यंत **सामान्य प्रशासन विभाग इंद्रभुवन, सोलापूर महानगरपालिका, डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक, रेल्वे लाईन, सोलापर येथे अर्ज स्वीकारण्यात येतील.** अथवा smcgados@gmail.com या ई मेल आयडीवर pdf मध्ये अर्ज सादर करून शकतील.

२) सदरची पदे ही सोलापूर जिल्ह्यातील ग्रामीण भाग (जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद सोलापूर) शहरी भाग (जिल्हा शल्यचिकित्सक, सोलापूर) व सोलापूर महानगरपालिका क्षेत्र (आरोग्य अधिकारी, सोलापूर महानगरपालिका) यांचे अधिपत्याखाली सेवा देणेकामी भरण्यात येत आहेत.

३) सदरची पदे **तात्पुरत्या स्वरूपाची असून, करार पद्धतीने अटी व शर्तीवर शासनाचे पुढील निर्देशानुसार भरण्यात येणार आहेत.**

४) अर्ज स्वीकृतीचा अंतिम दि. २७/३/२०२० रोजी सायंकाळी ६.०० वा. पर्यंत राहील.

५) प्राप्त अर्जानुसार इच्छुक उमेदवारांची जिल्हास्तरावर यादी तयार करण्यात येईल. शासनाचे या संबंधाने भविष्यात प्राप्त होणारे निर्देश, सद्य:स्थितीत उपलब्ध शासन निर्णय इत्यादी बाबी लक्षात घेऊन, करार पद्धतीने तात्पुरत्या स्वरूपासाठीच्या भरती प्रक्रिये बाबतचा योग्य तो निर्णय घेण्यात येईल.

**अटी व शर्ती :-**

१) वयोमर्यादा : कमाल वयोमर्यादा ही ७० वर्षापेक्षा अधिक नसावी.

२) इच्छुक सेवानिवृत्त अधिकारी/कर्मचारी यांनी अर्जासोबत त्यांचे संपूर्ण परिचय पत्र, शैक्षणिक पात्रतेसंबंधी सर्व आवश्यक कागदपत्रांच्या साक्षांकित प्रती, नोंदणी प्रमाणपत्र, जन्म तारखेचा पुरावा, सेवानिवृत्तीच्या आदेशाची प्रत, सेवा तपशील, दोन पासपोर्ट साईज फोटो जोडणे आवश्यक आहे.

३) सदरची जाहिरात ही सोलापूर महानगरपालिका यांचे www.solapurcorporation.gov.in, www.solapur.nic.in या संकेतस्थळावर प्रसिद्ध करणेत आलेली आहे.

४) निवड प्रक्रियेसंबंधित अधिक चौकशीकरिता डॉ. श्री. संतोष नवले, आरोग्य अधिकारी, सोलापूर महानगरपालिका (भ्रमणध्वनी क्र. ९४२२४५७९२६) यांचेशी संपर्क करावा.

५) उपरोक्त जाहिरात ही महाराष्ट्र शासनाचे वेळोवेळी प्रसारित होणारे शासन निर्णय, सूचना, आदेशाच्या अधिन राहील, शासनाने दिलेले सुधारित निर्देशानुसार भरती प्रक्रियेत बदल करण्यात येईल. तसेच संपूर्ण निवड प्रक्रियेचे अधिकार जिल्हाधिकारी सोलापूर यांचे राहतील.

सही/-xxx
(प्रकाश वायचळ)
**मुख्य कार्यकारी अधिकारी**
**जिल्हा परिषद सोलापूर**

सही/-xxx
(दीपक तावरे, भा.प्र.से.)
**आयुक्त, सोलापूर महानगरपालिका**
**सोलापूर**

सही/-xxx
(मिलिंद शंभरकर, भा.प्र.से.)
**जिल्हाधिकारी सोलापूर**

Scanned with CamScanner